# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

# Savitribai Phule Pune University

**(formerly University of Pune)**

## नोंदणीकृत पदवीधरांची अधिसभेवरील निवडणूक

**जाहीर प्रकटन**

सर्व संबंधितांना या जाहीर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम २८(२)(न)(28(2)(t)) व कलम १३१ मधील तरतुदीनुसार सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे दहा (१०) नोंदणीकृत पदवीधर (**Registered Graduates**) अधिसभेवर (**Senate**) निवडून द्यावयाचे आहेत. त्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पदवीधारकांकडून नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदणीसाठी, मतदार यादी तयार करण्यासाठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर **online** पद्धतीने **सोमवार, दिनांक १२ जून, २०१७ ते मंगळवार, दिनांक ११ जुलै, २०१७** या कालावधीत अर्ज मागविण्यात येत आहेत.

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १३१(१) नुसार खालील व्यक्ती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर होण्यास पात्र असतील :

**अ)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे पदवीधर;

**ब)** सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ कार्यक्षेत्रात (पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा) वास्तव्यास असलेल्या, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाची स्थापना होण्यापूर्वी मुंबई विद्यापीठाचे पदवीधर असलेल्या व्यक्ती (ज्यांनी मुंबई विद्यापीठाचे पदवी प्रमाणपत्र धारण केलेले आहे अशा व्यक्ती सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यास पात्र आहेत. त्यानुसार असे जे मुंबई विद्यापीठाचे पदवीधर नाव नोंदवू इच्छित असतील त्यांनी छापील अर्जासोबत खालील दस्तऐवज जोडावीत :

**(एक)** पदवी प्रमाणपत्र (उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.ई. इत्यादी);

**(दोन)** निवासाचा पुरावा (आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा;

**(तीन)** मुंबई विद्यापीठाच्या कुलसचिवांचे नोंदणीकृत पदवीधर असल्याबद्दलचे / नसल्याबद्दलचे (जे लागू असेल ते) प्रमाणपत्र.

अशा व्यक्तींची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाकडे नोंदणी झाल्यानंतर मुंबई विद्यापीठाचे नोंदणीकृत पदवीधर म्हणून असलेली नोंद आपोआप संपुष्टात येईल.)

ज्या व्यक्तीने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नाव नोंदविण्यासाठी वर नमूद केलेल्या पध्दतीप्रमाणे अर्ज केला असेल त्या व्यक्तीचे नाव अर्जातील विनंतीनुसार मतदार यादीत समाविष्ट केले जाईल.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६, कलम १३१(२) नुसार खालील व्यक्ती नाव नोंदणीसाठी अपात्र समजण्यात येतील :

जी व्यक्ती, -

**क)** विकल मनाची असेल आणि एखाद्या सक्षम न्यायालयाने तसे घोषित केले असेल; किंवा

**ख)** अमुक्त नादार असेल; किंवा

ग) ज्यात नैतिक अधःपतनाचा अंतर्भाव असेल अशा एखाद्या अपराधाबद्दल जिला दोषी ठरविण्यात आली असेल;

घ) लबाडीच्या मार्गाने एखादी पदवी मिळविली असेल; किंवा

ड) राज्यात कायद्याद्वारे स्थापन केलेल्या इतर कोणत्याही विद्यापीठाची नोंदणीकृत पदवीधर असेल;

**३. ऑनलाईन अर्ज भरण्यासंबंधीच्या सूचना :**

**अ)** ऑनलाईन अर्ज भरतांना पदवीधरांनी प्रथम अर्ज भरण्यासंबंधीच्या सर्व सूचना व्यवस्थित वाचाव्यात.

**ब)** ज्या व्यक्तीस सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नव्याने नव नोंदवावयाचे असेल त्या व्यक्तीने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावरील **Online Registrations→ Registered Graduates→ New Registration** या लिंकमार्फत **online** पद्धतीने माहिती भरावी व नंतर त्या अर्जाची छापील प्रत काढावी. नोंदणी शुल्क **रु.२०/- (रु.वीस फक्त) ''बँक ऑफ महाराष्ट्र'', ''ॲक्सीस बँक'', ''एच.डी.एफ.सी. बँक'' या बँकेच्या पुणे, अहमदनगर, नाशिक व सिल्व्हासा (दादरा नगर हवेली)** जिल्ह्यातील कोणत्याही शाखेत चलनाद्वारे रोख भरुन, छापील अर्जासोबत खालील नमूद केलेले दस्तऐवज जोडून अर्ज सादर करावा :

**(एक)** पदवी प्रमाणपत्र (उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.ई. इत्यादी);

**(दोन)** निवासाचा पुरावा (आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना) यापैकी एक पुरावा;

**(तीन)** नाव बदलले असल्यास शासकीय राजपत्राची किंवा विवाह नोंदणी प्रमाणपत्राची प्रत.

**ब) ज्या पदवीधरांनी यापूर्वीच आपली सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी केलेली असेल, अशा व्यक्तींनी मतदार यादीत नावाचा समावेश करण्याकरिता विद्यापीठाच्या election.unipune.ac.in** या संकेतस्थळावरील **Online Registrations→ Registered Graduates→ Existing** या लिंकमार्फत **online** पद्धतीने माहिती भरावी व नंतर त्या अर्जाची छापील प्रत काढून छापील अर्जासोबत खालील नमूद केलेले दस्तऐवज जोडून अर्ज सादर करावा :

**(एक) नावात बदल असल्यास -** शासन राजपत्राची / विवाह नोंदणी प्रमाणपत्राची साक्षांकित/स्वयं साक्षांकित प्रत.

**(दोन) पत्त्यामध्ये बदल असल्यास -** आधारकार्ड, निवडणूक ओळखपत्र, शिधापत्रिका, पारपत्र, विद्युत वापर देयक, वाहन चालन परवाना यापैकी एका पुराव्याची साक्षांकित/स्वयं साक्षांकित प्रत.

**(तीन) पदवी प्रमाणपत्राची साक्षांकित/स्वयं साक्षांकित प्रत. (उदा. बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., बी.एड., बी.ई. इत्यादी);**

**क) नव्याने नोंदणीकृत पदवीधर म्हणून नोंदणी करु इच्छिणाऱ्या व यापूर्वी नोंदणीकृत पदवीधर असलेल्या व मतदार यादीत नाव समाविष्ट करु इच्छिणाऱ्या व्यक्तींनी वरील तीन(अ)आणि(ब) मध्ये नमूद केलेले दस्तऐवज आणि त्यांचे छायाचित्र (Photo) व स्वाक्षरी (Signature) स्कॅन करुन ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करतांना अपलोड करणे आवश्यक आहे.**

४. नोंदणीकृत पदवीधर मतदार यादीत मतदार म्हणून नाव नोंदणीसाठी विद्यापीठाने ऑनलाईन नोंदणीची सुविधा विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिलेली आहे. तरी संबंधित अर्जदारास **सोमवार, दिनांक १२ जून, २०१७ ते मंगळवार, दिनांक ११ जुलै, २०१७** या कालावधीत ऑनलाईन पध्दतीने नाव नोंदणी करता येईल. तसेच सदर अर्जाची छापील प्रत आवश्यक त्या कागदपत्रांसह **मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०१७** पर्यंत निवडणूक विभाग, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ४११ ००७ व यापूर्वी जाहीर केलेल्या नोंदणीकृत पदवीधर नोंदणी मदत केंद्रावर कार्यालयीन वेळेत **सकाळी १०.२० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत** (कार्यालयीन सुट्टीचे दिवस वगळून) स्वीकारण्यात येईल.

५. संबंधित अर्जदाराने छापील अर्जावर स्वाक्षरी केलेली असावी. अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या स्व-साक्षांकित छायांकित प्रती जोडाव्यात. अपूर्ण असलेला अर्ज तसेच पदवी प्रमाणपत्र अर्जासोबत न जोडल्यास अर्ज दप्तरी दाखल करण्यात येईल व त्या संदर्भात कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

६. नोंदणीकृत पदवीधर संघाचा मतदार म्हणून मतदार यादीमध्ये नोंद होण्यासाठी **मंगळवार, दिनांक १८ जुलै, २०१७** नंतर आलेले अर्ज, अपूर्ण अर्ज तसेच आवश्यक ती कागदपत्रे (पदवी प्रमाणपत्र) न जोडलेले अर्ज कोणत्याही परिस्थितीत स्वीकारले जाणार नाहीत, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.

७. निर्देश, प्रकटन, निवडणूक कार्यक्रम, निवडणूक सूचना, मतदार याद्या, इ.बाबी फक्त विद्यापीठाच्या **election.unipune.ac.in** या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द केल्या जातील. सबब, विद्यापीठाच्या संकेत स्थळावरील संबंधित माहिती सर्व संबंधितांनी वेळोवेळी ज्ञात करुन घेणे आवश्यक आहे.

**(डॉ. अरविंद दिगंबर शाळीग्राम)**
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११ ००७
संदर्भ क्र. : साफुपुविनि/**३०**
दिनांक : **१०**/०६/२०१७

**परिशिष्ट**

# स्वयं-घोषणापत्र

मी, श्री / श्रीमती .................................................................... खाली सही करणार, या स्वयं-घोषणापत्राव्दारे खालीलप्रमाणे घोषित करत आहे :

१) माझे पूर्वीचे नाव .................................................................. असे असून माझ्या पदवी प्रमाणपत्रावर ........................................ सदर नाव नमूद केले आहे.

२) # ...................................................................... या कारणास्तव माझे सदर नाव बदलून ...................................................................... असे झाले आहे.

३) मी माझ्या बदललेल्या नावाने सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अधिसभेच्या सन २०१७ मध्ये होणा-या नोंदणीकृत पदवीधर निवडणुकीसाठी नोंदणी करु इच्छितो / इच्छिते. माझ्या बदललेल्या नावाच्या पुष्टर्थ मी ● .................................................... ची स्व-साक्षांकित छायांकित प्रत सोबत जोडली आहे.

वर नमूद केलेली माहिती ही खरी व बरोबर असून त्यामधील कोणताही मजकूर चुकीचा आढळल्यास होणा-या परिणामांची जबाबदारी सर्वस्वी माझेवर राहील. अशा परिस्थितीत सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठास माझे विरुध्द योग्य ती कायदेशीर कारवाई करता येईल, याची मला जाणीव आहे.

सही

संपूर्ण नाव : ...........................................

मतदार यादीतील क्रमांक (असल्यास) : .........

# नाव बदलाचे कारण नमूद करावे.

● बदललेले नाव दर्शविणारे कागदपत्र नमूद करावे. (नांव बदलाचे राजपत्र/विवाह नोंदणी प्रमाणपत्र)